ijamrsd.com JAMRSD ISSN: 2583-6404
Journal of Advanced Multidisciplinary Research Studies and Development
Peer Reviewed Referred Journal Bi-monthly Open Access

# महाराष्ट्रातील आदिवासी जमात व आदिवासी जमातीला पुरविल्या जाणाऱ्या विविध योजनांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम "(कालखंड-2024-2025)

**डॉ. श्रावण बाबुलाल तडवी**
*सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, श्री. शेठ मुरलीधरजी मानसिगकासाहित्य विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाचोरा, जिल्हा जळगाव.*
*Email: shravantadavi@gmail.com*

**सारांश:**
सदर संशोधनात विविध अभ्यासकांनी दिलेल्या आदिवासी समाजाच्या व्याख्यांच्या आधारे त्यांच्या सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. भारतात 461 तर महाराष्ट्रात 48 आदिवासी जमाती असून त्या विशिष्ट भूप्रदेशात राहतात, समान भाषा व संस्कृती जपतात आणि साध्या अर्थव्यवस्थेवर आधारित जीवन जगतात. आधुनिक युगातही या जमाती मागासलेल्या अवस्थेत आहेत. शासनाने विविध योजना राबवल्या असल्या तरी त्या प्रभावीपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. या पार्श्वभूमीवर आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून योजनांची माहिती, उपलब्धता व अंमलबजावणी सुधारून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाला कशी गती देता येईल याचा अभ्यास करण्यात आला आहे.
**मुख्य शब्द:** आदिवासी समाज, महाराष्ट्रातील आदिवासी, शासकीय योजना, माहिती तंत्रज्ञान, सामाजिक-आर्थिक विकास.

► *Corresponding Author: डॉ. श्रावण बाबुलाल तडवी*

**प्रस्तावना:**
आदिवासी जमातीच्या बाबतीत विविध संशोधक अभ्यासकांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेले आहेत, यात, मदन मुजुमदार यांच्या मतानुसार," समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या, व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समाजाचा उल्लेख आदिवासी समाज म्हणून नेहमी केला जातो." गीलिन  यांच्या मतानुसार," एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा व समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात."इम्पेरियल गॅझेट मध्ये आदिवासींची व्याख्या अशी केलेली आहे "समान बोलीभाषा बोलणाऱ्या एकच  प्रदेशात राहणाऱ्या सुरुवातीला अंतरविवाह असण्याची शक्यता असलेल्या पण सर्वसामान्यपणे अंतर विवाह नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबाच्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात" विविध संशोधक व अभ्यासकांच्या या विभिन्न व्याख्यावरून असे स्पष्ट होते की, आदिवासी जमात विशिष्ट भूप्रदेशात राहते ,त्यांची अर्थव्यवस्था साधी व सरळ आहे त्यांची तंत्र विद्या मर्यादित असून या जमातीतील बऱ्याच आदिवासींचा  समान धर्म आहे भारतात 461 आदिवासी जमाती असून भारताच्या विविध राज्यांमध्ये ही जमात विखुरलेल्या अवस्थेत आहे .
महाराष्ट्र राज्यात आदिवासी जमातीतील एकूण 48 जमाती वेगवेगळ्या विभागात राहतात .यात प्रामुख्याने अंध, भिल्ल, तडवी भिल्ल, धानका, गामीत तथा मावची गोंड  , हलबा हलबी काथोडी, कातकरी, कोकणा, कोलाम,  महादेव कोळी, कोळी मल्हार, कोरकू ,प्रधान, पारधी, ठाकूर ,वारली, बैगा ,बरडा भाईना, भारीया, भात्रा, भुंजिया बिंजवार, बिरहुल, चोधरा ,धनवार, धोडिया ,दुबळा कमार, कव्हर ,खैरवर, व खारीया, खोंड, कोया ,नागेशिया नायकडा, ओराव, परजा पटोलिया,  राठवा, सवर , विटोलिया जमाती वेगवेगळ्या विभागात राहते .आदिवासी जमात अजूनही आधुनिक युगात मागासलेल्या अवस्थेत राहते .या जमातीच्या विकासासाठी शासनाने विविध योजना पुरविल्या .परंतु, या योजना त्यांच्या पदरात पडत नसल्याने अजूनही या जमातीची पाहिजे तेवढी उन्नती होत नाही म्हणून महाराष्ट्रातील आदिवासी जमात

व आदिवासी जमातीला पुरविल्या जाणाऱ्या विविध योजनांवर आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा काय परिणाम होऊ शकतो हा विषय सदर शोध निबंधासाठी घेण्यात आलेला आहे.

**संशोधन विषयाची निवड:**
संशोधक हा आदिवासी भागातील रहिवासी असून आदिवासी जमातीतील लोकांची आर्थिक स्थिती जवळून पाहिलेली आहे .आदिवासींसाठी कोणकोणत्या योजना पुरविल्या जातात याची माहिती आहे आदिवासी जमात तिला शासनाकडून आर्थिक उत्थानासाठी वेगवेगळ्या योजना पुरविल्या जातात त्या योजना आदिवासी जमातीत का पोहोचत नाही ज्या पोहोचतात त्या अर्धवट का पोहोचतात याबाबत मनात उत्सुकता निर्माण झाली व प्रस्तुत विषयाचे संशोधनासाठी निवड करण्यात आली .

**संशोधन विषयाची उद्दिष्टे:**
१) महाराष्ट्रातील आदिवासी जमात व जमातीला पुरविल्या जाणाऱ्या विविध योजनांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा आर्थिक उन्नतीसाठी कितपत परिणाम होतो याचे अध्ययन करणे .
२) महाराष्ट्रातील आदिवासी जमात व जमातीला पुरविल्या जाणाऱ्या विविध योजनांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा सामाजिक स्थितीवर कितपत परिणाम होतो याचे अध्ययन करणे .

**संशोधन पद्धती:**
सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून हे संशोधन प्राथमिक, दुय्यम माहितीवर आधारित आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती आणि आदिवासी विकास विभागाची वेबसाईट व आदिवासी जमातीतील लिखित साहित्याच्या साहाय्याने मिळविले आहे.

**संशोधनाची गृहिते:**
१) महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील लोकांना विविध शासकीय योजनांची माहिती नाही .
२) महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील लोकांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतलेला नाही .

**पूर्व संशोधनाचा आढावा:**
आदिवासी जमाती विषयी अनेक लेखक व अभ्यासकांनी संशोधन व लेखन कार्य केलेले आहे यात प्रामुख्याने जगताप दिलीप रामभाऊ यांनी "स्थलांतरित आदिवासींचे अध्ययन" इंगळे जयवंत शंकरराव यांनी ,"महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी शेती विषयक अभ्यास" कोकाटे चंद्रकांत व सोळुंखे रामकृष्ण यांनी," हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे दारिद्याची विश्लेषण" या व यासारख्या विषयावर संशोधन झालेले आहे. परंतु, महाराष्ट्रातील आदिवासी जमात् आदिवासी जमातीला पुरविल्या जाणाऱ्या विविध योजनांवर आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम या विषयावर कोणीही संशोधन केलेले नाही म्हणून सदर विषय संशोधनासाठी निवडला.

**स्पष्टीकरण:**
आदिवासी जमातीच्या विकासासाठी शासनाने विविध योजना पुरविलेल्या आहेत यात प्रामुख्याने शासकीय आश्रम शाळा योजना ,विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी कन्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय ,एकलव्य रेसिडेन्शिअल स्कूल, इयत्ता आठवी ते बारावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती, वाहतूक भत्ता योजना, व्यावसायिक पाठ्यक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे, आदिवासी मुलामुलींकरिता शासकीय वसतिगृहे ,व्यवसाय प्रशिक्षण केंद्र पोलीस व सैन्यदल भरती पूर्व प्रशिक्षण, केंद्र मोटार वाहन चालक प्रशिक्षण, केंद्र औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना, आदिवासी मुलींमधील गळती थांबविण्यासाठी प्रोत्साहन भत्ता, राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना, आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप तेलपुरवठा करणे योजना, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना, भारतीय संविधानाच्या 275 एक अंतर्गत जिल्ह्यात वाडी कार्यक्रम राबविणे ,आदिम जमातीसाठी विकासाच्या योजना खावटी कर्ज, योजना धान्य कोश योजना, अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवा योजना नोंदणी ,आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना संस्थांना

आदिवासी सेवक सेवा संस्था पुरस्कार योजना ,आदिवासी हस्तकला प्रदर्शन, आदिवासी पारंपारिक नृत्य स्पर्धा ,वारली चित्रकला स्पर्धा योजना, आदिवासी लोकांकरिता नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धा पूर्व प्रशिक्षण योजना, नव संजीवन योजना, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी योजना ,कृषी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना आदिवासी शेतकऱ्यांना दारिद्र्यरेषेवर आणण्यासाठी पॅकेज योजना, पशुसंवर्धन विभागाकडून पुरविल्या जाणाऱ्या योजना अविरुद्ध पाण्यात मत्स्य संवर्धन करणे, या व यासारख्या विविध योजना पुरविल्या जातात. परंतु, या योजना आदिवासी जमातीला माहीत होत नसल्याने त्यांचा आर्थिक विकास होऊ शकत नाही .परंतु, या योजना त्यांना माहीत करून देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या आधाराने म्हणजे संगणक सॉफ्टवेअर नेटवर्किंग आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करून डिजिटल डेटा किंवा माहिती तयार करणे माहिती तंत्रज्ञानाच्या आधाराने जर या विविध योजना आदिवासी जमाती पर्यंत पोहोचविल्या त्यांना या योजनांची माहिती होईल व त्यांना या योजना माहीत झाल्यास त्यांचा आर्थिक विकास होऊ शकतो व ते समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतात आजच्या मोबाईलच्या युगात बऱ्याच जणांजवळ मोबाईल आहे हे एक माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख साधन आहे मोबाईल च्या आधाराने विविध योजनांची माहिती त्यांना उपलब्ध करून दिल्यास त्याचप्रमाणे यावर त्यांना माहिती मेळावा उपलब्ध करून दिल्यास ते या विभिन्न योजनांचा लाभ करून घेऊ शकतात व त्यांचा आर्थिक विकास होऊ शकतो त्याचप्रमाणे माहिती तंत्रज्ञानाच्या आधाराने त्यांच्या राहणीमानात सुधारणा होऊन ते जे समाजाच्या मुख्य प्रवाहा पासून दूर लोटल्या गेलेले आहे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता येऊ शकते. असे झाल्यास त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास होऊन त्यांना आपले जीवन व्यवस्थित जगता येऊ शकते हे केवळ माहिती तंत्रज्ञानाच्या आधाराने शक्य होऊ शकते.

**संदर्भ:**

१) डॉ. गारे गोविंद महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे २०००
२) प्रा. नाडगोंडे गुरुनाथ द. भारतीय आदिवासी कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे १९७९
३) आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका
४) महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास भवन वेबसाईट
५) महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील विविध मुलाखत दात्यांच्या मुलाखतीवरून